.. Tulasi Arati ..

# ॥ तुळशीची आरती ॥

जय देवी तुळसी माते बहु पुण्यपावनी ।
तुज करितो आरती ही लीन पदीं होऊनी ॥ धृ ॥

त्रिभुवन हें लघु आहे तव पत्राहुनि अति ।
मुळी ब्रह्मामध्यें शौरी राहे तो बहु प्रीतीं ॥
अग्री शंकर शाखापरिवारीं शोभती ।
दर्शनें तुझ्या पापें हरती गे मुळिहुनी ॥ जय ॥ १॥

तव छाया शीतल दे व्यापक तूं भूतळी ।
बहु प्रीति मंजिरीची विधिजनका लागली ॥
तव दलाविण होते बहु त्यांते काहिली ।
कार्तिकी बहु आहे तव महिमा या जनीं ॥ जय ॥ २॥

अच्युता माधवा हे मधुसूदना जगत्पती ।
तव पूजनीं बहु प्रेमें ऐसें जे गर्जती ॥
देशी त्यां संततीही सुख सारें बहु प्रीती ।
विठ्ठलात्मज विनवी भावें तारी स्वामिनी ॥ जय ॥ ३॥

इति

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated January 27, 1999